गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २१९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




## मा.आ.कैलास गोरंटयाल आज गुरु गणेश भवनमध्ये स्वीकारणार शुभेच्छा

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल हे त्यांच्या वाढदिवसा निमित्त आज गुरुवार दि.९ एप्रिल रोजी शहरातील गुरू गणेश भवनमध्ये सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत उपस्थीत राहून पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांच्या शुभेच्छा स्वीकारणार आहेत.

सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात असलेल्या पाताल हनुमान मंदीरात दर्शन आणि आरती करण्यात येणार असून त्यानंतर ९.३० वाजता रामतीर्थ स्मशान भूमीमध्ये विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात येणार आहे.सकाळी १० वाजता पांजरापोळ गौशाळेत गोमातांना चारा देणार आहेत.तेथेच गुळतुला व रक्तदान शिबिरास उपस्थिती, १०.३० वाजता कन्हैय्यानगर येथील श्री कृष्ण हिंदी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते होणार आहे.१०.३० वाजता कडबी मंडी येथे मिठाई वाटपाचा कार्यक्रम होणार असून त्यानंतर १०.४५ वाजता मोदीखाना भागातील दक्षिण हनुमान मंदिर येथे फळतुला कार्यक्रमास उपस्थिती, सकाळी ११ वाजता गुरू गणेश अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्नेह भोजन व पादत्राणे वाटप करण्यात येणार असून त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत श्री गोरंटयाल हे उपस्थीत राहून जालना विधानसभा मतदार संघातील पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी, व्यावसायिक, विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांच्या शुभेच्छा स्वीकारणार आहेत. दरम्यान, यावर्षी मा.आ.कैलास गोरंटयाल हे वाढदिवशी हार, पुष्पगुच्छ, शाल स्वीकारणार नाहीत. त्या ऐवजी गणवेश,वही,पेन आदी शैक्षणिक साहित्य भेट म्हणून स्वीकारणार असून सदर साहित्य मनपा शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार असल्याचे युवा नेते नगरसेवक अक्षय गोरंटयाल यांनी म्हटले आहे.




## समृद्धी महामार्ग अपघात : आठ मृतांच्या कुटुंबीयांना ४० लाखांची मदत

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख रूपये

**मुंबई -** जालना जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर दि. १ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या अपघातात आठ महिलांचा मृत्यू झाला. सदर घटनेच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या मदतीनुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख प्रमाणे एकूण रुपये ४० लाख इतकी आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. ही रक्कम जिल्हाधिकारी, जालना यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. अपघात जालना शहरालगतच्या कडवंची गावाजवळ सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास घडला. मजुरांना घेऊन जाणाऱ्या पिकअप वाहनास मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. अपघातात आठ महिलांचा जागीच मृत्यू झाला असून पाच व्यक्ती जखमी झाल्या आहेत. जखमींवर जालन्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मृतांमध्ये लक्ष्मीबाई संतोष मदन, कडुबाई रामदास मदन, ताराबाई गहेनाजी चौधरी, मंगलाबाई प्रकाश सिनगारे, सुमनबाई कचरू अदमाने, अलकाबाई दादाराव अदमाने, मिनाबाई परमेश्वर अदमाने व कांचनबाई प्रकाश अदमाने यांचा समावेश आहे. घटनेची माहिती प्राप्त होताच समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्षामार्फत तात्काळ आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी पाठविण्यात आल्या. रुग्णवाहिका व पोलीस यांच्या समन्वयातून जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्राथमिक तपासात संबंधित ट्रक चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले असून त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत. समृद्धी महामार्गावर घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी व वेदनादायक असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची तात्काळ दखल घेऊन मृतांच्या कुटुंबीयांना मदत देण्याचे निर्देश दिले आणि त्यानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. शिवाय, जखमींना आवश्यक ती वैद्यकीय मदत तातडीने मिळावी, यासाठीही प्रशासनाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत. गरजू नागरिकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी बाबत अधिक माहितीसाठी व मदतीसाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा असे श्री.रामेश्वर नाईक कक्ष प्रमुख मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष यांनी कळविले आहे.

## लोकनेते कैलास गोरंट्याल

# जालन्याच्या विकासाचे शिल्पकार आणि जनसेवेचा वारसा



९ एप्रिल रोजी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचा वाढदिवस. तीन दशकांहून अधिक काळ जालना जिल्ह्याच्या राजकारणात आणि समाजकारणात सक्रिय राहिलेले गोरंट्याल हे केवळ एक राजकीय नेते नसून जालन्याच्या विकासाचे एक महत्त्वाचे केंद्रबिंदू आहेत. नगरसेवक ते तीन वेळा आमदार असा त्यांचा प्रवास हा निष्ठेचा, संघर्षाचा आणि विकासाप्रती असलेल्या ध्येयाचा आहे.

**विकासाचा महामेरू: जालन्यातील महत्त्वपूर्ण योगदान**

कैलास गोरंट्याल यांच्या राजकीय कारकिर्दीचे सर्वात मोठे यश म्हणजे जालन्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ( ) मंजूर करून घेणे हे मानले जाते. जालन्यातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली व्हावीत आणि स्थानिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

शिक्षणाचे व्हिजन: वैद्यकीय महाविद्यालय हे केवळ एक सुरुवात असून, भविष्यात जालन्यात स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा त्यांचा मानस आहे. ग्रामीण भागातील तरुणांना उच्च शिक्षणासाठी पुणे-मुंबईकडे धाव घ्यावी लागू नये, हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

पायाभूत सुविधा: जालना शहराचा कायापालट करण्यासाठी त्यांनी अनेक प्रकल्प राबवले. वंदे भारत रेल्वे जालन्यात सुरू होण्यामागे त्यांचा पाठपुरावा महत्त्वपूर्ण ठरला आहे. जालन्याला स्वच्छतेकडून समृद्धीकडे नेण्यासाठी त्यांनी कचरा व्यवस्थापन आणि रस्ते विकासाचे अनेक प्रकल्प हाती घेतले.

**सामाजिक बांधिलकी आणि समाज नेतृत्व**

गोरंट्याल यांचा समाजकारणातील आवाका केवळ राजकारणापुरता मर्यादित नाही. ते पद्मशाली समाजाचे एक प्रभावशाली नेते असून त्यांनी समाजाच्या उत्थानासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत.

समाजहित आणि सेवा: श्री मार्कंडेय पद्मशाली सेवा समितीच्या माध्यमातून त्यांनी समाजातील डिजिटल क्रांतीला चालना दिली. ३ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांनी समाजाच्या स्वतंत्र जनगणना पोर्टलचे उद्घाटन केले.

मानवतावादी उपक्रम: समाजातील अंत्यसंस्काराची समस्या लक्षात घेऊन त्यांनी स्वर्गरथ (अंत्यसंस्कार व्हॅन) आणि शितपेटी या प्रकल्पांचे लोकार्पण केले. एखादी संस्था केवळ धार्मिक कार्यापुरती मर्यादित न राहता संवेदनशील विषयांवर काम करते, तेव्हा ती समाजाला नवी दिशा देते, असे त्यांचे मत आहे.

युवा आणि आरोग्य: आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मदत आणि विवाह जुळवणी यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी तळागाळातील लोकांपर्यंत मदत पोहोचवली आहे.

**उत्कृष्ट विधिमंडळ कार्य आणि जनसंपर्क**

एक लोकप्रतनिधी म्हणून कैलास गोरंट्याल यांचा विधानसभा कामकाजातील सहभाग अत्यंत प्रभावी राहिला आहे.

उपस्थितीचा उच्चांक: महाराष्ट्राच्या १४ व्या विधानसभेत (२०१९-२०२४) त्यांची उपस्थिती ९२.७ टक्के इतकी होती, जी राज्याच्या सरासरीपेक्षा (८३.५ टक्के) अधिक आहे. हे त्यांच्या कर्तव्याप्रती असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे.

प्रशासनावर पकड: आमदार असूनही ते दररोज चार तास नगरपरिषदेत बसून प्रशासनावर लक्ष ठेवत असत. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त निर्माण झाली आणि लोकांची कामे वेळेत पूर्ण होण्यास मदत झाली.

वक्तृत्व आणि शैली: गोरंट्याल हे त्यांच्या हजरजबाबीपणासाठी आणि शेरोशायरीसाठी प्रसिद्ध आहेत. विधानसभेत महत्त्वाच्या प्रश्नांवर आवाज उठवताना त्यांची शैली अनेकदा चर्चेचा विषय ठरली आहे.

**राजकीय प्रवास: नगरसेवक ते विकासपुरूष**

कैलास गोरंट्याल यांची कारकीर्द ही तळागाळातील राजकारणातून घडली आहे.

सुरुवातीचे दिवस: त्यांनी नगरसेवक म्हणून आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात केली, त्यानंतर जालना नगरपरिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला.

आमदार म्हणून झेप: १९९९, २००९ आणि २०१९ अशा तीन वेळा त्यांनी जालना मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. २००९ च्या निवडणुकीत त्यांनी २०,७७१ मतांच्या फरकाने मोठा विजय मिळवून आपली राजकीय ताकद सिद्ध केली होती.

राजकीय वारसा: त्यांचे सुपुत्र अक्षय गोरंट्याल हे देखील राजकारणात सक्रिय असून स्थानिक समस्या सोडवण्यासाठी ते पुढाकार घेत आहेत.

**व्यक्तिमत्त्व आणि कार्यशैली**

गोरंट्याल यांचा स्वभाव अत्यंत स्पष्टवक्ता आणि जनसामान्यांमध्ये मिसळणारा आहे. त्यांनी जालन्यात जनता दरबार ही संकल्पना राबवून लोकांच्या समस्या थेट ऐकल्या आणि त्या सोडवल्या. व्यापारी कुटुंबातून आले असूनही (किसनराव गोरंट्याल यांचे सुपुत्र) त्यांनी स्वतःला पूर्णतः समाजकारणात झोकून दिले आहे.

कैलास गोरंट्याल हे जालन्याच्या राजकारणातील एक असे व्यक्तिमत्व आहेत ज्यांनी विकास आणि समाजकारण यांची उत्तम सांगड घातली आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा आढावा घेताना हे स्पष्ट होते की, त्यांनी दिलेले योगदान जालन्याच्या प्रगतीच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून जालन्याचा विकास हाच त्यांचा एकमेव ध्यास राहिला आहे.

## डॉ. आंबेडकरांनी पत्रकारितेतून चळवळींना बळकट केले - प्रो. डॉ. विजय पाटील




**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल म्हस्के होते तर प्रमुख वक्ते प्रो.डॉ. विजय पाटील, उपप्राचार्य प्रो.डॉ.सुनील मेढे उपप्राचार्य डॉ.श्याम सर्जे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते प्रो.डॉ.विजय पाटील यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता या विषयावर आपले मत व्यक्त केले.ते म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे निश्चित भूमिकेतून पत्रकारितेकडे वळले. अस्पृश्यांचे म्हणणे जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी आपल्याजवळ प्रभावी असे एखादे साधन असावे याची तीव्र जाणीव डॉ.आंबेडकरांना झाली म्हणूनच मूक समाजच्या, वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी ते पत्रकारितेकडे वळले ,३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक पाक्षिकाचा जन्म झाला व त्यातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घनाघाती चळवळींना बळ मिळाले.३ एप्रिल १९२७ रोजी बहिष्कृत भारत हे पाक्षिक सुरू झाले. वृत्तपत्रातील सर्व मजकूर बाबासाहेब स्वतः लिहित असत २४नोव्हेंबर १९३०रोजी जनता वृत्तपत्राचा प्रथम अंक प्रकाशित झाला.गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल ही या वृत्तपत्राची बिरुदावली होती.४ फ ेब्रुवारी १९५६ रोजी जनता वृत्तपत्राचे नामकरण होऊन प्रबुद्ध भारत असे करण्यात आले.या वृत्तपत्रांमधून बाबासाहेबांनी मंदिर प्रवेश,चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन,रोटी व्यवहार व बेटी व्यवहार,सत्यशोधक चळवळीचा ध्येयवाद अशा विविध विषयांवर प्रभावी लेखन केले. त्यामुळे समाज जागृत झाला असल्याचे डॉ. पाटील म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.राहुल म्हस्के यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या विविध वृत्तपत्राचा आढावा घेतला व तसेच डॉ.आंबेडकरांचे लिखाण वृत्तपत्रात छापून आल्यानंतर ते गाव पातळीपर्यंत वाचून दाखवण्याचे काम शिक्षित वर्ग करत होता आणि ते अशिक्षित वर्गापर्यंत पोहोचत असल्याचे सांगितले,त्यामुळेच आंदोलनाला व चळवळीला खेड्यापाड्यातील लोकांचे बळ मिळत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सरिता मणियार यांनी केले तर आभार प्रा.सुरेश पांडे यांनी मानले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना -** जिल्ह्यात आगामी कालावधीत महात्मा फुले जयंती, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, लेनिन जयंती सीपीआय आदी सण, उत्सव तसेच शहरातील मिरवणुका व विविध कार्यक्रम आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.८ ते २१ एप्रिल २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. २१ एप्रिल २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, ४४४सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी-कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## उसतोड कामगारांच्या मुलांना क्रीडा साहित्याचे वाटप

### मोबाईलच्या वाढत्या दुनियेत खेळाचे महत्त्व अधोरेखित

**परतूर । प्रतिनिधी -** आजच्या आधुनिक युगात मोबाईल, इंटरनेट आणि डिजिटल साधनांचा वाढता वापर मुलांच्या दैनंदिन जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. मात्र, या तंत्रज्ञानाच्या अति वापरामुळे मुलांचे मैदानी खेळांपासून दूर जाण्याचे प्रमाण वाढत असल्याची चिंताजनक बाब समोर येत आहे. याच पार्श्वभूमीवर मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने उसतोड कामगारांच्या मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, त्यांचा शारीरिक व मानसिक विकास घडावा आणि मोबाईलचा मर्यादित वापर व्हावा या उद्देशाने क्रीडा साहित्य वाटपाचा उपक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास कृपीभुषन विजयआण्णा बोराडे. गटशिक्षधिकारी,राजेश जोशी. पोलिस निरीक्षक,मा आदिनाथ ढाकणे.मुख्याध्यापक, राजेश तैर.आश्वजित जाधव. एकनाथ राउत. यांच्या उपस्थितीत

उसतोड कामगारांच्या कुटुंबातील लहान मुला-मुलींना विविध प्रकारचे क्रीडा साहित्यक्रिकेट बॅट, बॉल, फ ुटबॉल, व्हॉलीबॉल, दोरीउडी, कबड्डी साहित्य आदींचे वाटप करण्यात आले. साहित्य मिळाल्याने मुलांमध्ये प्रचंड आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अनेक मुलांनी यापूर्वी अशा प्रकारचे साहित्य प्रत्यक्षात हाताळण्याची संधी मिळाली नसल्याने त्यांच्यासाठी हा अनुभव विशेष ठरला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी मुलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''खेळ हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून तो व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. नियमित खेळामुळे शरीर सुदृढ राहते, मन प्रसन्न राहते आणि संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण यांचा विकास होतो.'' त्यांनी पालकांनाही आवाहन केले की, मुलांना मोबाईलपासून दूर ठेवून खेळाकडे प्रोत्साहित करावे.



यावेळी काही शिक्षक व सामाजिक कार्यकर्त्यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, उसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडू शकतो आणि भविष्यात ते विविध क्षेत्रात आपली ओळख निर्माण करू शकतात.

कार्यक्रमात मुलांनी विविध खेळांचे प्रात्यक्षिक सादर केले तसेच काही ठिकाणी मैदानी खेळांचे आयोजन करून वातावरण अधिक आनंददायी करण्यात आले. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांचे आभार मानले.

एकूणच, हा क्रीडा साहित्य वाटप उपक्रम उसतोड कामगारांच्या मुलांसाठी प्रेरणादायी ठरला असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जाऊन मुलांना उज्ज्वल भविष्याच्या दिशेने वाटचाल करण्यास नक्कीच मदत होईल.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी,राजेश वाघमारे. सुरेखा वाघमारे. आकाश चैगुलै. महादेव खरात. योगेश आढे. दुर्गा नाडे यांनी परिश्रम घेतले.

## समृद्धी महामार्गावर गुंडेवाडी शिवारात अमोनियम नायट्रेट टँकर लीक; मोठा अनर्थ टळला

### हायवे बंद करून प्रशासनाची धावपळ; २४ तासांहून अधिक काळ सुरू ऑपरेशन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील गुंडेवाडी शिवारात मुंबईनागपूर समृद्धी महामार्गावर अमोनियम नायट्रेटने भरलेला एक टँकर लीक झाल्याची घटना समोर आली असून, वेळेवर केलेल्या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

या घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तात्काळ पावले उचलत संबंधित मार्गावरील वाहतूक बंद केली. संभाव्य स्फोटाचा धोका लक्षात घेऊन संपूर्ण परिसर सील करण्यात आला आणि वाहनांना सुरक्षित अंतरावरून वळवण्यात आले.

पोलिस अधीक्षक, जिल्हाधिकारी तसेच अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. तज्ज्ञांच्या मदतीने टँकरमधील गळती थांबवण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले.


दरम्यान, संबंधित टँकर सुरक्षित ठिकाणी हलवून बाजूला उभा करण्यात आला आहे.

काल सोमवार रोजी चार वाजले पासून जालन्यातील अग्निशमन दलाचे अधिकारी आणि कर्मचारी अग्निशमन बंब घेऊन परिश्रम घेत आहेत सलग आज मंगळवारी सहा वाजेपर्यंत अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांची कार्य सुरूच होते

टँकरमधील रसायन दुसऱ्या टँकरमध्ये हलवण्याची प्रक्रिया रात्री पार पडणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

ही घटना काल सायंकाळी चार वाजताच्या सुमारास घडली होती. त्यानंतर जवळपास २४ तासांहून अधिक काळ प्रशासनाकडून कारवाई सुरू होती आणि आज सायंकाळी सहा वाजेपर्यंत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहे.

दरम्यान, नागरिकांनी अफवांवर वश्विास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



जाफराबाद तालुक्याच्या वतीने मनीष श्रीवास्तव यांचा सत्कार

## पक्ष संघटनांवर भर देत गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक हा उपक्रम राबविणार - श्रीवास्तव



**दत्ता देशमुख**

**जाफराबाद** - जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी - शिवाजीनगर येथील हनुमान मंदीरात दि.०८ रोजी सकाळी ११ वाजता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नुकतेच नियुक्ती झालेले, जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव यांचे तालुक्याच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सत्काराला उत्तर देताना पक्ष प्रमुख मा.उद्धव जी ठाकरे यांनी माझ्यावर वश्विास ठेवत जिल्हा प्रमुख पदाची जी जबाबदारी सोपवली, त्याला माझ्याकडुन कुठेही तडा जाऊ न देता त्यांनी टाकलेला वश्विास सार्थ ठेवीन अशी ग्वाही दिली. तर माझा शिवसैनिक,शाखाप्रमुख, उपतालुका प्रमुख,तालुका प्रमुख,उपजिल्हाप्रमुख ते जिल्हाप्रमुख असा प्रवास असल्यामुळे माझ्या अनुभवाचा पक्षासंघटनासठी नक्कीच कमी आणील असेही सांगितले.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने गाव तिथे शखा व घर तिथे शिवसैनिक हे अभियान राबविण्याचा माझा मानस असून त्यात तुम्हा निष्ठावंत शिवसैनिकांची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची असणार आहे.त्यामुळे शिवसैनिक ते सामान्य कार्यकर्ता हे कुठल्याही प्रकारच्या संकटात असो वा त्यांच्यावर सत्ताधाऱ्यांकडून कुठलाही अन्याय झाला तर सर्वात पुढे मी राहील अशी ग्वाही दिली. त्यामुळे येणाऱ्या काळात कुठलेही मतभेद न करता सर्वांनी पक्ष वाढीसाठी सहकार्य करावे असे आवाहन केले.तर तालुका प्रमुख कुंडीलक पा.मुठ्ठे, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर जगताप, माजी जि.प. अध्यक्ष उत्तमराव वानखेडे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रल्हाद जाधव यांनी केले,तर आभार युवकचे उपतालुकाप्रमुख मुकेश माकोडे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला शिवसेनेचे माजी प.स. सदस्य किसन जोशी, चिमाजी उखर्डे,जेष्ठ शिवसैनिक तथा माजी सरपंच विष्णु पा.म्हस्के, हरीचंद्र म्हस्के, दत्तू सुद्रिक, जनार्दन झोरे, शिक्षक बाळू धनवई, देविसिंह बायस, परमेश्वर सरोदे, शिवाजी म्हस्के, समाधान सवडे, दिगंबर जाधव, बळीराम शेजुळ,दगडु तांबेकर,चंदू शिंदे,विष्णु लोखंडे,नागोराव बंगाळे, योगेश कापसे, गणपत बनकर, कुंडलिक बनकर, कारभारी पाचे, रामेश्वर खांडेभराड,योगेश शर्मा, शेख इरफान, समीर शहा, सुलतान कुरेशी,नंदू भालके,नंदू गायकवाड, सचिन म्हस्के, यांच्यासह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## जालना येथे अमृतपेठ थेट बाजारपेठ प्रदर्शनाचे आयोजन

**जालना -** स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्राहकांना दर्जेदार वस्तू थेट उत्पादकांकडून उपलब्ध करून देण्यासाठी अमृतपेठ - थेट बाजारपेठ या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन येत्या ११ व १२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. सदर प्रदर्शनाचे ठिकाण महेश भवन, मंठा चौफुली, जालना असे असून सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे. अमृतपेठ - थेट बाजारपेठ प्रदर्शनामध्ये घरगुती खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, कपडे, दागिने तसेच विविध उपयुक्त वस्तूंचे स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. या माध्यमातून स्थानिक महिला व उद्योजकांना त्यांच्या उत्पादनांची थेट विक्री करण्याची संधी मिळणार आहे.

# मंठा एमआयडीसीला हिरवा कंदील

### उद्योगमंत्री उदय सामंत सकारात्मक; आमदार बबनराव लोणीकरांच्या पाठपुराव्याला यश

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुका हा जालना जिल्ह्याच्या पूर्व भागातील महत्त्वाचा तालुका असून, औद्योगिक विकासासाठी अत्यंत पोषक वातावरण येथे उपलब्ध आहे. निम्न दुधना प्रकल्पातील वांजोळा या ठिकाणावरून ९५ गाव वॉटर ग्रीड अंतर्गत जलशुद्धीकरण केंद्र मधून १०० एकर मध्ये असणाऱ्या एमआयडीसीसाठी मुबलक पाणीपुरवठा होऊ शकतो या संदर्भातील तरतूद ९५ गाव वॉटर तयार करताना केलेला होती सुपीक जमीन, जलस्रोतांची उपलब्धता, जवळील विद्युत उपकेंद्र तसेच राष्ट्रीय महामार्ग आणि ब्रॉडगेज रेल्वे लाईनमुळे कनेक्टिव्हिटी सुलभ आहे. प्राथमिक पाहणीत सुमारे ७२ एकर शासकीय जमीन औद्योगिक वसाहतीसाठी उपलब्ध असून एमआयडीसी मुळे रोजगार, उद्योगवाढ आणि मतदारसंघाच्या अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

जालना जिल्ह्यातील मंठा येथे एमआयडीसी स्थापन करण्याच्या दृष्टीने ८ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकार्यालय जालना येथे संपन्न झालेल्या बैठकीत अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या बैठकीदरम्यान उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मंठा एमआयडीसीसाठी सकारात्मक भूमिका घेत तात्काळ कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा औद्योगिक विकासाचा प्रश्न आता मार्गी लागण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले आहे. या यशामागे आमदार बबनराव लोणीकर यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरला आहे.



आमदार बबनराव लोणीकर यांनी ५ मार्च २०२६ रोजी उद्योग विभागाकडे केलेल्या मागणीपासून ते प्रशासकीय पातळीवरील सातत्यपूर्ण संपर्क आणि पाठपुरावा यामुळेच हा प्रश्न शासनदरबारी गांभीर्याने घेतला गेला. त्यांच्या सक्रिय नेतृत्वामुळे मतदारसंघातील विकासकामांना नवी गती मिळत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. महसूल विभागाकडून अतिक्रमण दूर केल्यानंतर या क्षेत्रावर औद्योगिक वसाहत उभारण्याचा मार्ग पूर्णतः मोकळा होणार आहे. जल जीवन मिशनमधून पाणीपुरवठा आणि जवळील सबस्टेशनमधून वीजपुरवठा उपलब्ध होणार असल्याने उद्योगांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा सहज उपलब्ध राहतील असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. आमदार बबनराव लोणीकर एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी श्री भांबरे व मंठा तहसीलदार सुमन मोरे यांनी मंठा तालुक्यातील उमरखेडा ठेंगेवडगाव व टोकवाडी या तिन्ही गावांचा संयुक्त दौरा केला. यादरम्यान ठेंगेवडगाव शिवारात ४० एकर टोकवाडी शिवारात ३० एकर तर उमरखेडा शिवारात ७२ एकर जमिनीची पाहणी केली. त्यातील उमरखेडा या गावापासून जालना जिंतूर नांदेड राष्ट्रीय महामार्ग ४ किमी, समृद्धी महामार्ग ६ किमी, शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग ३ किमी, जालना ड्रायपोर्ट ५० किमी परतुर रेल्वे स्टेशन २५ किमी छत्रपती संभाजी नगर विमानतळ १२० किमी एमआयडीसीसाठी पाण्याची तरतूद असलेल्या ९५ गाव वॉटर ग्रीड चे जलशुद्धीकरण केंद्र दोन किमी वीज पुरवठा करणारे १३२ केवी २ किलोमीटर अंतरावर आहे अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांना दिली.

परतूर येथील विद्यमान औद्योगिक वसाहतीचा अनुभव मंठा एमआयडीसीसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. परतुर येथे विकसित झालेल्या या वसाहतीत ९३ भूखंडांपैकी ७७ भूखंडांचे वाटप झाले असून त्यापैकी २५ उद्योग सुरू आहेत, तर काही ठिकाणी बांधकाम सुरू आहे. औषधनिर्मिती, दुग्धव्यवसाय, अन्नप्रक्रिया, कोल्ड स्टोरेज, सोलार ऊर्जा यांसारखे विविध उद्योग येथे कार्यरत आहेत असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती, पूरक व्यवसायांची वाढ आणि आर्थिक उलाढाल वाढल्याचे स्पष्ट दिसून येते. हाच अनुभव मंठा येथेही पुनरावृत्त होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एमआयडीसीमुळे मतदारसंघाची सर्वांगीण प्रगती होणार असून मंठा एमआयडीसी स्थापन झाल्यानंतर नवीन उद्योग उभारल्यामुळे स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल. स्थलांतर कमी होऊन युवकांना आपल्या गावाजवळच संधी मिळेल असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

मंठा परिसर कृषीप्रधान असल्याने अन्नप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, तेल गिरण्या, कोल्ड स्टोरेज यांसारखे उद्योग वाढतील. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला थेट बाजारपेठ मिळेल. रस्ते, वीज, पाणी, ड्रेनेज यांसारख्या सुविधा सुधारतील. औद्योगिक विकासामुळे संपूर्ण परिसरातील नागरी सुविधा उंचावतील. उद्योगांमुळे व्यापार, सेवा क्षेत्र, वाहतूक, बांधकाम यांसारख्या पूरक व्यवसायांना चालना मिळेल. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था अधिक सक्षम बनेल असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

एमआयडीसीमुळे मोठ्या आणि मध्यम उद्योगांची गुंतवणूक आकर्षित होईल. त्यामुळे जालना जिल्ह्याच्या औद्योगिक नकाशावर मंठा ठळकपणे दिसू लागेल. आमदार बबनराव लोणीकरांचे नेतृत्व पुन्हा अधोरेखित

या संपूर्ण प्रक्रियेत आमदार बबनराव लोणीकर यांनी दाखवलेली दूरदृष्टी, प्रशासनाशी सातत्याने ठेवलेला संपर्क आणि विकासासाठीची बांधिलकी यामुळेच हा प्रकल्प वास्तवात उतरण्याच्या मार्गावर आला आहे. मंठा एमआयडीसीची स्थापना ही केवळ एक औद्योगिक योजना नसून संपूर्ण मतदारसंघाच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाचा पाया ठरणार आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आणि लोणीकरांच्या पाठपुराव्यामुळे आता मंठा औद्योगिक वकिासाच्या नव्या पर्वात प्रवेश करण्यास सज्ज झाला आहे.

यावेळी जिल्हाधिकारी असीमा मित्तल निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी श्री भांबरे, एमआयडीसी चे सीईओ श्री वेलारासू, मुख्य अभियंता पकाश चव्हाण उ सह मुख्य कर्यकारी अधिकारी वर्षा ठाकूरप उपमुख्य कार्यकारी अधिकारी विवेक बोडके सहसचिव श्री पुलकंदवार, विभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड परतुर तहसीलदार दामोदर जाधव मंठा तहसीलदार सुमन मोरे यांच्यासह एमआयडीसीचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# टेंभुर्णी महसूल मंडळ स्तरीय दहा एप्रिलला महाराजस्व अभियान शिबीर

## महसूल अधिकारी ब्राह्मणे यांचे आवाहन

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** महसूल विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून येत्या दहा एप्रिल रोजी टेंभुर्णी महसूल मंडळ स्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व आभियान समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे... यामध्ये विविध योजनांची माहिती प्रमाण पत्र देण्यात येणार आहे.. तरी शेतकऱ्यांनी व गरजूं लाभधारक नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन टेंभुर्णी महसूल अधिकारी भिमराज बाम्हाणे यांनी केले आहे.. जाफ्राबाद तालुक्यातील मंडळ स्तरावरील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व आभियान समाधान

शिबिरास जालना जिल्हाधिकारी श्रीमती आसिमा मित्तल आ संतोष दानवे उपजिल्हाधिकारी रमेश मिसाळ भोकरदन उपविभागीय अधिकारी यावेळी बी सरवन यांचे मार्गदर्शन लाभणार आहे सदरील शिबीर जेबीके महाविद्यालयात दिनांक १० एप्रिल शुक्रवारी सकाळी न ऊ वाजेला सुरुवात होणार आहेत यावेळी कुंभाझरी महसूल आकोला देव महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती राहणार यावेळी शेतकऱ्यांचे रस्ता शेतजमीन विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वाचे मार्गदर्शन मिळणार आहे तरी सर्व शेतकरी लाभधारक यांनी या शिबिरास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शबिरास जालना जिल्हाधिकारी श्रीमती आसिमा मित्तल आ संतोष दानवे उपजिल्हाधिकारी रमेश मिसाळ भोकरदन उपविभागीय अधिकारी यावेळी बी सरवन यांचे मार्गदर्शन लाभणार आहे सदरील शिबीर जेबीके महाविद्यालयात दिनांक १० एप्रिल शुक्रवारी सकाळी न ऊ वाजेला सुरुवात होणार आहेत यावेळी कुं भाझरी महसूल आकोला देव महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती राहणार यावेळी शेतकऱ्यांचे रस्ता शेतजमीन विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वाचे मार्गदर्शन मिळणार आहे तरी सर्व शेतकरी लाभधारक यांनी या शिबिरास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भाजीपाला विकणाऱ्या वडीलाचे "खाकी वर्दीचे" मुलीने केले स्वप्न पूर्ण




**परतुर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील श्रीष्टी वाहेगाव येथील कुमारी योगिता सतीश आघाव हिची अमरावती येथे झालेल्या पोलीस भरतीमध्ये निवड झाली. अत्यंत गरीब परिस्थितीचा सामना करत तिने जिद्द ,अभ्यासाची चिकाटी व सततचा ग्राउंडचा सराव करत वडिलांचे "खाकी वर्दीचे" स्वप्न पूर्ण केले. योगिताचे वडील आठवडी बाजारात भाजीपाला विकण्याचे काम करतात. आणि त्यावरतीच त्यांनी मुलीचे बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यावर मुलीने पोलीस भरतीसाठी तयारी सुरू केली. अमरावती येथे झालेल्या पोलीस भरतीमध्ये तिची एकमेव निवड झाली. याकरिता तिचा आज सत्कार करण्यात आला याप्रसंगी गणेश शिंदे ,बालाजी शिंदे, दत्ताप्रसाद कोलगावकर ,तिचे वडील सतीश आघाव, उमेश कदम इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.